मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 16 डिसेंबर 2024 | पान- 1

# मेट्रो पिलर विद्युत रोषणाई सुशोभीकरणाचा निर्णय मागे

**त्या कामाचा निधी यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयासाठी वळवण्यात आला : विरोध झाल्याने तसेच, महामेट्रोने प्रतिसाद न दिल्याने हा निर्णय मागे घेण्यात आला.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने पिंपरी ते दापोडी या मार्गावरील मेट्रो मार्गिकेच्या खालील पिलरखाली विद्युत रोषणाईद्वारे सुशोभीकरण करण्यात येत होते. मात्र, तो निर्णय प्रशासनाकडून मागे घेण्यात आला आहे. त्या कामाचा निधी यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयासाठी वळवण्यात आला आहे.

महामेट्रोने पिंपरी ते दापोडी या मार्गावर मेट्रोची मार्गिका तयार केली आहे. त्या उन्नत मार्गावरून मेट्रो धावत आहे. मेट्रो मार्गिकेखालील पिलरच्या जागेत महापालिकेच्या वतीने विद्युत रोषणाई करून सुशोभीकरण करण्यात येणार होते. त्या खर्चास स्थायी समितीने मान्यताही दिली होती. त्यासाठी महापालिका अर्थसंकल्पात ५ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूदही करण्यात आली होती.




मात्र, विरोध झाल्याने तसेच, महामेट्रोने प्रतिसाद न दिल्याने हा निर्णय मागे घेण्यात आला. ते काम रद्द झाल्याचे अधिकारी सांगत आहेत. त्या कामाचा निधी वायसीएम रुग्णालयात नवीन यूपीएस यंत्रणा बसवण्यासाठी केला जाणार आहे. त्यासाठी ४० लाखांचा निधी वायसीएममधील विद्युत कामासाठी वळवण्यात आला आहे.

वायसीएम रुग्णालयात ९ ऑपरेशन थिएटर, ३ मोठे आयसीयू, १ एनआयसीयू, प्रसूतिगृह, पोस्ट ऑपरेटिव्ह, प्री ऑपरेटिव्ह आदी अत्यावश्यक ठिकाणी २४ तास वीजपुरवठा आवश्यक आहे. त्यासाठी ८ केव्हीएचे ४ यूपीएस २०११ पासून यंत्रणा सुरू आहे. ती यूपीएस यंत्रणा वारंवार तांत्रिक बिघाडामुळे बंद होत आहे. त्यामुळे नवीन यूपीएस बसवण्यात येत आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात १ कोटी २० लाखांची तरतूद होती. ती रक्कम कमी पडत असल्याने मेट्रो पिलर सुशोभीकरणाच्या कामाचे ४० लाखांची रक्कम या कामासाठी वळवण्यात आली आहे. त्या वर्गीकरणास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सर्वसाधारण सभेची मान्यता दिली आहे.

महापालिकेच्या वतीने पिंपरी ते दापोडी या मार्गावरील मेट्रो मार्गिकेच्या खालील पिलरखाली विद्युत रोषणाईद्वारे सुशोभीकरण करण्यात येत होते. मात्र, तो निर्णय प्रशासनाकडून मागे घेण्यात आला आहे. त्या कामाचा निधी वायसीएम रुग्णालयात नवीन यूपीएस यंत्रणा बसवण्यासाठी केला जाणार आहे. त्यासाठी ४० लाखांचा निधी वायसीएममधील विद्युत कामासाठी वळवण्यात आला आहे.

## विमा सखी योजना महिलांना स्वावलंबी बनविण्यात महत्त्वाचे योगदान देईल : आमदार शंकर जगताप

**प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची नोंदणी आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आली.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेला एलआयसीचा विमा सखी योजने मुख्य उद्देश महिलांना विमा क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे हा आहे. महिलांना मानधनासह रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करून त्यांना समाजात स्वावलंबी बनवण्याच्या दिशेने हा कार्यक्रम महत्त्वाचे योगदान देईल, असे मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या एलआयसीच्या विमा सखी योजना पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच लागू करण्यात आली असून, याचा शुभारंभ पिंपळे गुरव येथील आमदार शंकर जगताप यांच्या जनसंपर्क कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची नोंदणी आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आली.



या कार्यक्रमाला माजी महापौर माई ढोरे, माजी नगरसेविका उषाताई मुंढे, सामाजिक कार्यकर्ते नितीन इंगवले, बुद्धिजीवी सेलचे अध्यक्ष मनोजकुमार मारकड, रोजगार, स्वयंरोजगार आणि कौशल्य विकास आघाडीचे जिल्हा संयोजक भारत मदने, शुभम नखाते, तसेच एलआयसीचे अधिकारी प्रमोद ढोणे आणि महेश पाटील यांसारखे मान्यवर उपस्थित होते.

नारी शक्ती हा आपल्या देशाच्या प्रगतीचा कणा आहे. विमा सखी योजना महिला सक्षमीकरणासाठी मोठे योगदान देईल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महिला विकासाच्या दृढ संकल्पाला बळकट करेल," असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला.

विमा सखी योजना ही केंद्र व राज्य सरकारच्या महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या उपक्रमांच्या मालिकेतील एक महत्त्वाचा भाग आहे. लेक लाडकी योजना, बेटी बचाओ-बेटी पढाओ, सुकन्या योजना, प्रधानमंत्री मातृ वंदन योजना, उज्ज्वला योजना, मुद्रा योजना, आणि स्टार्टअप इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे आज महिलांना विविध क्षेत्रात पुढे जाण्याचे मार्ग उघडले आहेत. या योजनांमधून प्रेरणा घेऊन विमा सखी योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सशक्त करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## पिंपरी-चिंचवड पोलिसांसाठी वाकडमध्ये स्वतंत्र रुग्णालय

**आयुक्तालय 2018 मध्ये कार्यान्वित झाल्यापासून पोलिसांसाठी स्वतंत्र रुग्णालयाची मागणी होती**

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वतंत्र पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय २०१८ मध्ये कार्यान्वित झाल्यापासून पोलिसांसाठी स्वतंत्र रुग्णालयाची मागणी होती. अखेर वाकडमध्ये पोलिसांसाठी रुग्णालय सुरू करण्यात आले आहे.



वाकड येथील कावेरीनगर येथील पोलिस वसाहतीत हे रुग्णालय सुरू केले आहे. पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१३) उद्घाटन करण्यात आले. सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदीप डोईफोडे, विवेक पाटील, स्वप्ना गोरे, विशाल गायकवाड, डॉ. शिवाजी पवार, बापू बांगर, पुण्याचे आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकृष्ण पवार, औंध रुग्णालयाचे प्रमुख डॉ. नागनाथ एमपल्ले उपस्थित होते. वैद्यकीय अधिकारी अनुपमा कांबळे, डॉ. संजय भारती यांच्यासह आठजणांची रुग्णालयासाठी नियुक्ती केली आहे.

विनयकुमार चौबे म्हणाले की, कामाचा ताण आणि शारीरिक, मानसिक थकवा आल्याने पोलिसांना स्वतःकडे लक्ष देणे शक्य होत नाही. यातून आरोग्याचे प्रश्न उद्भवतात. त्यासाठी आयुक्तालय स्तरावर पोलिस रुग्णालय कार्यान्वित केले आहे. यामाध्यमातून पोलिसांसाठी अनेक सुविधा आहेत.

पिंपरी- चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत ४,९२७ महिला आणि पुरुष अधिकारी आणि कर्मचारी कार्यान्वित आहेत. त्यांना पुण्यातील शिवाजीनगर येथील पोलिस रुग्णालयात जावे लागते. यात त्यांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. अनेकांना तिथेपर्यंत जाणे सहज शक्य होत नाही. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्येच रुग्णालय प्रस्तावित करण्यात आले.

# पुणे आणि खडकी कँटोन्मेंटचे महापालिकेत विलीनीकरणासाठी कागदपत्रे तयार होईना

## पायाभूत सुविधांसाठी पुणेकरांचा संघर्ष, तक्रारींचा डोंगर, निधीच्या खर्चाचा ताळमेळ बसेना

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील कँटोन्मेंट बोर्ड स्थानिक महापालिकांमध्ये विलीन करण्याचा निर्णय केंद्रीय पातळीवर घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे आणि खडकी कँटोन्मेंटचे पुणे महापालिकेत विलीनीकरण करण्यासाठी जोरदार बैठकांचा धडाका सुरू आहे.

देशातील कँटोन्मेंट बोर्ड स्थानिक महापालिकांमध्ये विलीन करण्याचा निर्णय केंद्रीय पातळीवर घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे आणि खडकी कँटोन्मेंटचे पुणे महापालिकेत विलीनीकरण करण्यासाठी जोरदार बैठकांचा धडाका सुरू आहे. यापूर्वी, अतिरिक्त आयुक्तांच्या स्तरावर झालेल्या बैठकीत महापालिका आयुक्तांनी प्रथमच हजेरी लावली. अंतिम निर्णय केंद्र आणि राज्य सरकार घेणार असले तरी, अजूनपर्यंत कँटोन्मेंट बोर्डाकडून महापालिकेला विलीनीकरणाबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे केवळ चर्चांचे गुऱ्हाळ सुरू असून कागदपत्रे तयार होत नसल्याची परिस्थिती आहे.

पुणे आणि खडकी कँटोन्मेंट ही दोन प्रमुख कँटोन्मेंट पुण्यात आहेत. त्यांचे महापालिकेत विलीनीकरण करण्याबाबत महापालिका आणि कँटोन्मेंट बोर्डाच्या प्रशासनाच्या दरम्यान चर्चांची मालिका सुरू आहे. मंगळवारी (दि. १०) झालेल्या बैठकीला महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., मालमत्ता विभागाचे सहसंचालक राजेंद्र जगताप, पुणे कँटोन्मेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुब्रत पाल, खडकी कँटोन्मेंटच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी लोहिया आणि दोन्ही कँटोन्मेंट बोर्डाचे अध्यक्ष ब्रिगेडिअर संदीप वासुदेवा उपस्थित होते. या बैठकीत कँटोन्मेंट बोर्डाने मार्गदर्शन तत्त्वे सादर करण्याचे ठरवले.



### प्रभागरचनेवर नव्याने काम करावे लागणार

» महापालिका हद्दीत समाविष्ट झालेली उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही दोन गावे पुन्हा वगळण्यात आली आहेत. या गावांची नगरपरिषद स्थापन करण्यात येणार आहे. तीन वर्षांपूर्वी महापालिका निवडणुकीसाठी प्रभागरचना करण्यात आली होती, ज्यात या दोन्ही गावांचा समावेश होता. आता ही गावे वगळल्यामुळे नव्याने प्रभागरचना करावी लागणार आहे. तसेच, पुणे आणि खडकी कँटोन्मेंट बोर्डाचा महापालिका हद्दीत समावेश करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. त्यामुळेही महापालिका निवडणुकीसाठी प्रभागरचना नव्याने करावी लागणार आहे.

### हे आहेत अडचणीचे मुद्दे

» पुणे कँटोन्मेंटमध्ये ३६२ कर्मचारी कार्यरत आहेत, तर खडकी कँटोन्मेंटमध्ये ३४५ कर्मचारी आहेत. केंद्र शासनाच्या सेवेत ६० व्या वर्षी सेवानिवृत्ती असते, त्याचे वेतन आणि वेतन आयोगाचे नियम वेगळे असतात. तर राज्य महापालिकेत सेवानिवृत्ती ५८ व्या वर्षी असते. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सेवेत घेताना आर्थिक बाबींवर विचार करणे आवश्यक आहे, तसेच महापालिकेला निधी मिळवणे आवश्यक आहे. याशिवाय कँटोन्मेंटमध्ये लष्करी आस्थापना असल्याने सुरक्षिततेचे मुद्दे, अंतर्गत रस्त्यांची देखभाल, दुरुस्तीचे मुद्दे, पालिकेचे कँटोन्मेंट बोर्डाकडे थकीत असलेली देणी, इमारतींच्या उंचीवर निर्बंध, बांधकामांची परवानगी आणि इतर सोई-सुविधांबाबत एकमत होईल का, याबाबत अनिश्चितता आहे. कँटोन्मेंट बोर्डाने गाईडलाईन्स सादर केल्यानंतरच या सर्व मुद्द्यांबाबत स्पष्टता येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. महापालिका महापालिकेची बाजू राज्य शासनाला कळविणार आहे आणि त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# सृजनशील समाजासाठी वाचन संस्कृती टिकणे महत्त्वाचे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन

**पिंपरी | प्रतिनिधी**

"समाजातील सृजनशीलता कायम राहण्यासाठी वाचन संस्कृती जिवंत ठेवावी लागेल. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. त्यामुळे मराठी बोलणाऱ्यांची जबाबदारी वाढली आहे. विचारवंत, सजृनशील मूल्य जिवंत ठेवण्यासाठी वाचनसंस्कृती जतन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तसेच "वाचनासाठी एक तास' हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येणार आहे. तसेच पुणे पुस्तक महोत्सवाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन फडणवीस यांनी दिले.



राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे (एनबीटी) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार चंद्रकांत पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, "एनबीटी'चे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, संयोजक राजेश पांडे, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डीईएसच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रमोद रावत, सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टचे आचार्य पवन त्रिपाठी, ज्येष्ठ लेखिका डॉ. अरूणा ढेरे, लोकमान्य मल्टिपर्पज को. ऑप. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. सोमनाथ पाटील, उद्योजक विशाल चोरडिया, कृष्णकमार गोयल, प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, डॉ. संजय चाकणे, डॉ. आनंद काटीकर या वेळी उपस्थित होते. यावेळी "एनबीटी'ला पुढील तीस वर्षांसाठी पुण्यात जागा उपलब्ध करून देण्याचे पत्र पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी दिले.

पुस्तक महोत्सवासाठी पुण्यापेक्षा उपयुक्त दुसरे शहर नाही, असे सांगून फडणवीस म्हणाले, "ज्ञानाची दारे उघडून देणाऱ्या ग्रंथ संपदेचे डिजिटल युगात काय होणार असा प्रश्न पडत आहे. परंतु आज नवीन पिढी पुस्तके, ग्रंथ विकत घेत आहे, वाचत आहे हे आशादायी चित्र आहे. "एआय' तंत्रज्ञानामुळे माहितीचे संकलन होऊ शकते, परंतु ग्रंथ आणि पुस्तकामुळेच सजृनशील समाज घडू शकतो. तंत्रज्ञानामुळे आपल्याला इतर भाषांतील अनुवादित पुस्तके वाचण्यासाठी सहज उपलब्ध होत आहेत, यामुळे ज्ञानाचे नवीन दालन या तंत्रज्ञानामुळे उघडले जात आहे.'

डॉ. अरुणा ढेरे यांनी महाराष्ट्राची वाङ्मयीन परंपरा पुढे जाणारा, सांस्कृतिक जाणिवा समृद्ध करणारा हा महोत्सव असल्याचे नमूद केले. मिलिंद मराठे यांनी गणेशोत्सव, सवाई गंधर्व महोत्सवाप्रमाणे आता पुणे पुस्तक महोत्सव ही ओळख निर्माण होत असल्याचे म्हटले. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी प्रास्ताविक केले.

# रेल्वे रुळांवर कचरा टाकल्याने धोका

## आवाहन करूनही दुर्लक्ष, रेल्वे प्रशासन कारवाईच्या पवित्र्यात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे विभागातील काही रेल्वे रूळाजवळ वस्तीभाग असल्यामुळे येथील कचरा रूळाजवळच टाकला जातो. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकरता येत नाही. याबाबत रेल्वे प्रशासनाकडून वारंवार नागरिकांना जनजागृतीतून आवाहन केले जात आहे, मात्र कचरा कमी होत नाही. नागरिकांची एक चूक जीवावर बेतू शकते, त्यामुळे नागरिकांनी कचरा टाकू नये असे आवाहन यावेळी रेल्वे प्रशासनाने केले आहे.



पुणे रेल्वे विभागातील पुणे-मिरज-कोल्हापूर रेल्वेमार्ग हा मुंबई-पुणे-दक्षिणेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. हा मार्ग पुणे शहरालगत परिसरातून जातो. मात्र, घोरपडी-सासवड-फुरसुंगी दरम्यानच्या रेल्वे रुळाजवळ सय्यदनगर, काळेपडळ, रामटेकडी आणि घोरपडी चाळ परिसरात राहणारे नागरिक रेल्वे रुळावर मोठ्या प्रमाणात कचरा टाकत आहेत. रेल्वे रुळाशेजारी कचरा टाकल्याने काही वेळा आगीच्या घटना घडू शकतात. तसेच कचरा टाकल्याने भटके जनावरे खाण्यासाठी येत असतात. त्यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रवाशांच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये, यासाठी कचरा टाकू नये, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले.

तेल टँकर, कोळसा आणि इतर ज्वलनशील वस्तूंची वाहतूक रेल्वेद्वारे केली जाते. रुळांलगत कचरा जाळला जात असल्याने याची झळ मालगाडीला बसल्यास मोठा धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना रेल्वे रुळावर, मार्गावर कचरा टाकून नये, असे आवाहन पुणे रेल्वे विभागाने केले आहे. यानंतरही कचरा टाकल्यास रेल्वे कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्याचा इशाराही रेल्वे प्रशासनाने केला आहे.

# विनयकुमार ठरले कार्यकाळ पूर्ण करणारे पहिले आयुक्त

## दोन वर्षांत आयुक्तांनी केले आमूलाग्र बदल, लोकाभिमुख कामकाजावर दिला भर, गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील कायदा सुव्यवस्थेची घडी बसवण्यासाठी प्रमुखाला म्हणजेच पोलीस आयुक्तांना किमान दोन वर्षांचा कालावधी आवश्यक असतो. उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमधील वाढती गुन्हेगारी आणि नागरिकीकरण लक्षात घेता १५ ऑगस्ट २०१८ रोजी स्वतंत्र आयुक्तालय कार्यान्वित झाले. मात्र, गेल्या सहा वर्षांत मागील चार आयुक्तांना आपला कार्यकाळ पूर्ण करता आला नव्हता. परंतु, सध्याचे आयुक्त विनयकुमार चौबे यांनी आपला कार्यकाळ १४ डिसेंबरला पूर्ण केला असून, या कालावधीत अनेक लोकहिताची कामे केली आहेत.

आयुक्तालयाची घडी बसवण्यासाठी पोलीस आयुक्तांनी त्यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण अपेक्षित असते. त्यानुसार विनयकुमार चौबे यांनी पोलीस आयुक्तपदाचा कार्यकाळ पूर्ण केला असून, पिंपरी-चिंचवड पोलीस दलाचे प्रमुख म्हणून दोन वर्षांचा कालावधी पूर्ण करणारे ते पहिले आयुक्त ठरले आहेत.

आयुक्त चौबे यांनी जागा, मनुष्यबळ, वाहने उपलब्ध करून घेत आयुक्तालयाची घडी बसवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. उद्योगनगरी, कामगारनगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील तसेच औद्योगिक परिसरातील गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी पुणे शहर व पुणे ग्रामीण पोलीस दलाची विभागणी करून स्वतंत्र पोलीस आयुक्तालय कार्यान्वित करण्यात आले.

सुरुवातीच्या काही वर्षांत पुरेसे मनुष्यबळ, वाहने, जागा, इमारत यासह नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती, विविध पथके आदींची उपलब्धता होऊन पोलीस आयुक्तालयातील कामकाजाची घडी बसवणे आवश्यक होते. त्यासाठी तत्कालीन पोलीस आयुक्तांनी पूर्णपणे प्रयत्न केले. मात्र, त्यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची मूदतपूर्व बदली झाली.

आयुक्तालयातील अडचणी, समस्या समजून घेऊन त्याबाबत वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करीत असतानाच चारही आयुक्तांच्या बदल्या झाल्या. मात्र, अपर पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी असलेले विनयकुमार चौबे हे दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे पिंपरी-चिंचवडचे पहिले पोलीस आयुक्त ठरले आहेत.



### आयुक्तालय, मुख्यालय, पोलीस ठाण्यांसाठी जागा

» पोलीस आयुक्त चौबे यांनी आयुक्तालयासाठी चिखली येथे ३.३९ हेक्टर जागा शासनाकडून मिळवली. तेथे आयुक्तालय उभारण्यासाठी १८०.६२ कोटींचा निधी मंजूर करून घेतला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासाठी व परिमंडळ दोन उपायुक्तांच्या कार्यालयासाठी वाकड येथील कस्पटे वस्तीत पीएमआरडीएकडून १५ एकर जागा तसेच शासनाकडून २४९ कोटींचा निधी मंजूर करून घेतला. यासह पोलीस मुख्यालयासाठी ताथवडे येथे ५० एकर जागा, चिखली पोलीस ठाणे, परिमंडळ तीन उपायुक्त कार्यालयासाठी जागा, यासह साहाय्यक आयुक्त व पोलीस ठाणे, चौक्यांसाठीही जागा मिळवल्या. देहूरोड येथे बंदोबस्तासाठी येणाऱ्या पोलिसांसाठी विश्रामगृह मंजूर केले.

### मनुष्यबळ, साधनसामग्री, नवीन पोलीस ठाणे

» पोलीस आयुक्तालय कार्यान्वित झाले त्यावेळी केवळ तीन पोलीस उपायुक्त पदे मंजूर होती. आयुक्त चौबे यांनी एक अपर आयुक्त आणि दोन उपायुक्तांची तर साहाय्यक आयुक्तांची चार पदे मंजूर करून घेतली. संत तुकारामनगर, दापोडी, काळेवाडी, बावधन या चार पोलीस ठाण्यांची निर्मिती केली. त्यासाठी ३९० पदे मंजूर करून घेतली. अमली पदार्थ शोध व गुन्हे शोध श्वानपथक मंजूर करून १० पदे मंजूर करून घेतली. यासह नवीन १०१ जीप, १० बस, एक ट्रक, एक टँकर, तीन टेम्पो ट्रॅव्हलर व २९ दुचाकी मिळवल्या आहेत.

### वाहतूक कोंडी सोडवण्यास प्राधान्य

» बेशिस्त वाहतुकीवर आळा बसविण्यासाठी टोनिंग व्हॅन प्रोजेक्ट राबवण्यात आला. यासाठी स्वतंत्र साडेचारशे अधिक मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले. यापूर्वीपर्यंत वाहतूक विभागासाठी स्वतंत्र उपायुक्त नव्हते. चौबे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर वाहतूक विभागासाठी एक उपायुक्त व दोन साहाय्यक आयुक्तांची नेमणूक केली. शाळांमध्ये, महाविद्यालयात, कंपन्यांमध्ये वाहतुकीबाबत समुपदेशन करण्यात येते.

# जाचक अटींमध्ये अडकली शैक्षणिक सहल

## शैक्षणिक सहलीसाठी पालकांकडून लेखी संमतीपत्र अनिवार्य, दुर्घटना घडल्यास संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापकांची

**पिंपरी | प्रतिनिधी**

शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना इतिहास, भौगोलिक ठिकाणांची माहिती व्हावी यासाठी सहलीचे नियोजन केले जाते. मात्र, शासनाने सहलीसाठी जाचक अटी ठेवल्या आहेत. एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकांवर राहणार आहे. मुख्याध्यापकांनी तसे हमीपत्र द्यायचे आहे. याशिवाय पालकांना संमतीपत्र द्यावे लागणार असल्याने सहलीबाबत द्विधा मनस्थिती निर्माण झालेली आहे.

शाळेची सहल काढावयाची असल्यास मुख्याध्यापकांनी ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र द्यायचे आहे. तसेच सहलीला निघण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून संमतीपत्र देणे बंधनकारक आहे. सहलीमध्ये शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाल्यास संबंधित मुख्याध्यापक व शिक्षक जबाबदार राहणार आहेत.

त्यांच्यावर नियमानुसार गरज भासल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांची हेळसांड, कुचंबणा, शारीरिक व मानसिक त्रास झाल्याची पालकांकडून तक्रार आल्यास संबंधित मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. सहलीमध्ये विद्यार्थ्यांच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व सहलीतील शिक्षक यांच्यावर राहील. यंदा शालेय विद्यार्थ्यांचा हिरमोड होत असल्याचे पाहायला मिळत आहे.



> शैक्षणिक सहलीसाठी आत्तापर्यंत ७ ते ८ शाळांनी शिक्षण विभागाकडे परवानगी मागितली आहे. मागील वर्षांत घडलेल्या काही दुर्घटनांमुळे फक्त समुद्रावर सहल काढण्यास परवानगी नाही. यामध्ये पालकांनी हेल्थ सर्टीफिकेट, हमीपत्र द्यायचे आहे. शैक्षणिक सहल नेताना विद्यार्थी सुरक्षेची जबाबदारी शाळेची असते. त्यामुळे त्यांनीही हमीपत्र द्यायचे आहे.
>
> - संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका

दरम्यान, शालेय व्यवस्थापन कामकाजामुळे मुख्याध्यापक स्वत: सहलीला जात नाहीत. मुख्याध्यापकांना जबाबदार न धरता अटींमध्ये थोडी शिथिलता येणे गरजेचे असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. अनेकदा पालक हमीपत्र देत नाहीत. या निर्बंधामुळे पालकवर्ग मुलास सहलीला पाठवण्यास तयार होत नाही. शाळेकडे तर जबाबदारी आहेच पण पालकांचा प्रतिसाद नसल्यामुळे शाळाही जबाबदारी घेत नाहीत अशा दोन्ही बाजू आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील सहलीसाठी प्रामुख्याने एसटीची बस आरक्षित केली जाते. त्यासाठी एसटीला स्वतंत्र महसूल मिळतो. मात्र, अलीकडच्या काळामध्ये सहलींसाठी एसटीची मागणी कमी झालेली आहे. त्यातच अशा जाचक अटी निर्माण झाल्याने आणि सहल रद्द झाल्याने एसटीचा महसूल बुडणार आहे.

# युवतींच्या हाती मोबाईलऐवजी चक्क लाठी काठी

## शिरुर तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालय मधील युवतींना मोफत लाठीकाठी व कराटे प्रशिक्षण उपक्रम सुरु केला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या अनेक ठिकाणी युवतींबाबतच्या छेडछाडीच्या घटना वाढू लागल्या असल्याने युवतींच्या सुरक्षिततेची गरज निर्माण झाली आहे. हा दृष्टीकोन लक्षात ठेऊन संजय तांबे व मिलिंद ठोके या मित्रांनी अनोखा उपक्रम हाती घेत शिरुर तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालय मधील युवतींना मोफत लाठीकाठी व कराटे प्रशिक्षण उपक्रम सुरू केला आहे.

जातेगाव खुर्द (ता.शिरुर) येथील संजय तांबे या युवकाने किसान ऑल स्पोर्ट्स करिअर अकादमी सुरू केली असून त्या माध्यमातून मुलींच्या संरक्षणाची गरज ओळखून संजय तांबे व मिलिंद ठोके या दोघांनी शिरुर तालुक्यातील शाळा व महाविद्यालय येथे मुलींना मोफत लाठी काठी व कराटे प्रशिक्षण सुरू केल्याने शिरुर तालुक्यातील तब्बल तीन हजारहून अधिक युवती प्रशिक्षित झाल्या आहेत.



### शालेय अभ्यासात सदर प्रशिक्षणाची गरज – सीमा पवार

» शिरुर तालुक्यातील शाळांमध्ये सध्या किसान ऑल स्पोर्ट्स करिअर अकादमीच्या वतीने सुरु असलेले प्रशिक्षण हे शालेय अभ्यासातील क्रीडा प्रकारात सुरु करण्याची गरज असून त्यामुळे सर्वच मुली शाळकरी जीवनापासून स्वावलंबी बनतील असे सिमाई महिला आधार फाउंडेशनच्या अध्यक्षा सीमा पवार यांनी सांगितले.

सध्या शिरुर तालुक्यातील सर्व शाळांमध्ये मुलींनी लाठी काठी प्रशिक्षण देण्यासाठी किसान ऑल स्पोर्ट्स करिअर अकादमीचे सल्लागार संतोष दरेकर, भूषण घोलप हे विशेष प्रयत्न करत आहे. तर एकीकडे सध्या युवती मोबाईलमध्ये गुंतून राहत असताना त्यांच्या हाती मोबाईलऐवजी लाठी काठी देऊन युवतींना स्वसंरक्षणासाठी स्वतः पुढे येण्यासाठी स्वावलंबी बनवण्यासाठी संजय तांबे व मिलिंद ठोके या मित्रांनी सुरू केलेल्या अनोख्या उपक्रमाचे शिरुर तालुक्यातील कौतुक होत आहे. मुलींबाबत एखादी घटना घडल्यास त्यांनी कोणाची वाट न पाहता स्वतः प्रतिकार करण्याची गरज असताना संजय तांबे यांच्या या उपक्रमामुळे मुली नक्कीच धाडसी होतील

युवतींबाबतच्या छेडछाडीच्या घटना वाढू लागल्या असल्याने युवतींच्या सुरक्षिततेची गरज निर्माण झाली आहे. हा दृष्टीकोन लक्षात ठेऊन संजय तांबे व मिलिंद ठोके या मित्रांनी अनोखा उपक्रम हाती घेत शिरुर तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालय मधील युवतींना मोफत लाठीकाठी व कराटे प्रशिक्षण उपक्रम सुरू केला आहे.

### एक लाख मुलींना प्रशिक्षणाचा संकल्प . . .

» शिरुर तालुक्यातील सर्व शाळांतील मुलींना याबाबतचे प्रशिक्षक देऊन तब्बल एक लाख मुलींना स्वसंरक्षणार्थ लाठी काठी प्रशिक्षण देण्याचा आमचा संकल्प असल्याचे संजय तांबे यांनी सांगितले.

### मुली नक्कीच धाडसी होतील – तृप्ती देसाई

» सध्या मुलींवरील अन्याय अत्याचाराच्या घटना पाहता मुलींनी सक्षम होणे गरजेचे आहे, मुलींबाबत एखादी घटना घडल्यास त्यांनी कोणाची वाट न पाहता स्वतः प्रतिकार करण्याची गरज असताना संजय तांबे यांच्या या उपक्रमामुळे मुली नक्कीच धाडसी होतील आणि पुढील काळात सध्या होणाऱ्या घटना नक्कीच कमी होतील असे भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी सांगितले.

# पहिल्याच दिवशी उच्चांकी 45 रुपये किलो दर

## पुरंदर तालुक्यातील नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शनिवारी(दि.14) पासून कांदा लिलावाला सुरुवात झाली

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शनिवारी(दि.14) पासून कांदा लिलावाला सुरुवात झाली आहे. यावेळी झालेल्या लिलावात राज्यातील उच्चांकी 45 रुपये किलो दर मिळाला. यामुळे स्थानिक शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून यापुढेही असाच उच्चांकी दर दिल्यास नीरा बाजार समितीत कांद्याची आवक वाढेल असे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

हळवी कांदा साठवणूक करता येत नसल्याने तो आता बाजारात विक्रीसाठी येत आहे. त्याचबरोबर आगाप लागवड केलेला गरवी कांदा ही काढणीला आला आहे. त्यामुळे



पुढील काळात बाजारात मोठ्या प्रमाणावर कांदा येणार आहे. याची दखल घेत नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी तातडीने कांदा लिलाव सुरू केले आहेत. मागील वर्षी फेब्रुवारी महिन्यात कांदा लिलावाला सुरुवात झाली होती. दर शनिवारी हा कांदा लिलाव सुरू राहणार असल्याचे सभापती शरद जगताप यांनी सांगितले.

ज्येष्ठ संचालक अशोक निगडे व बाळासाहेब जगदाळे यांच्या हस्ते शनिवार दुपारी चार वाजता वजनकाट्याची पूजा व श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. यावेळी सभापती शरद जगताप, संचालक देविदास कामठे, भाऊसाहेब गुलदगड, राजकुमार शहा, गणेश होले, बाळासाहेब शिंदे, सुशांत कांबळे, अनिल माने, विक्रम दगडे, पृथ्वीराज निगडे, व्यापारी मनसुखलाल शहा, बिपीन शहा, दिलीप परदेशी, निलेश स्वामी, शुभम शहा यांसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. यामुळे प्रातिनिधिक स्वरूपात पहिल्या शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे, हमाल, तोलारी यांचे स्वागत गुलाबपुष्प व श्रीफळ देऊन करण्यात आले.

पुरंदर व बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य बाजारभाव मिळावा यासाठी हे संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. पुढील महिन्यापासून पहाटेच्या वेळी भाजिपाल्याचा बाजार सुरू करत आहोत. तसेच भुसार बाजारासाठी प्रसिद्ध असलेल्या नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीत आता नव्याने धान्य खरेदी विक्री केली जाणार आहे.

> “ पुरंदर व बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य बाजारभाव मिळावा यासाठी हे संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. पुढील महिन्यापासून पहाटेच्या वेळी भाजिपाल्याचा बाजार सुरू करत आहोत. तसेच भुसार बाजारासाठी प्रसिद्ध असलेल्या नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीत आता नव्याने धान्य खरेदी विक्री केली जाणार आहे. यासाठी व्यापाऱ्यांशी बोलणी झाली आहे. मार्च महिन्यात धान्य बाजार सुरू करुन, नीरा बाजार समितीचे गत वैभव पुन्हा प्राप्त करू.
>
> - शरद जगताप, सभापती, बाजार समिती, नीरा